# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: **pldvp@unipune.ac.in**

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निववि/२०३

दिनांक : ४/३/२०२१

मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : राज्यातील शिक्षकांच्या आवाजाची काळजी घेणेबाबत कार्यशाळा आयोजित करणेबाबत.

संदर्भ : शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. शिआका/२५२१/ प्र.क.२६/मवि—१. २१०४, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय जोडलेल्या पत्रान्वये उच्च शिक्षणातील सर्व शिक्षकांना आवाजाचा व्यावसायिक वापर, त्याची काळजी कशी घ्यावी याबाबत ऑन-लाईन कार्यशाळा घेण्याकरीता सहकार्य करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर कार्यशाळा ह्या शिक्षकांसाठी अत्यंत उपयोगी, तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागातील गुणवत्ता वाढीसाठी व शिक्षकांच्या आरोग्यासाठी अतिशय सकारात्मक परिणाम करणाऱ्या आहेत, असे नमूद केलेले असून, उपरोक्तप्रमाणे ऑन-लाईन कार्यशाळांचे आपल्या महाविद्यालय/परिसंस्थांच्या स्तरावर आयोजन करण्यात येऊन याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करण्यात यावा.

कळावे,

४/३/२०२१

(डॉ. वैशाली बा. साकोरे)
उपकुलसचिव
नियोजन व विकास विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत :

१. मा. प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune.gov.in | E-Mail : mavi. dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२१११,२६०५५५१२,२६१२०५२७,२६१२४५३९ | फॅक्स नं.०२०/२६१२११५३.


क्र.: शिआका/२५२१/प्र.क्र.२६/मशि-१. 2 105 | दिनांक: १८.०२.२०२

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण.महाराष्ट्र

२. कुलसचिव, सर्व अकृषी./अभिमत/ स्वयं अर्थसाहीत विदयापीठे/ महाराष्ट्र राज्य.

**विषय: राज्यातील शिक्षकांच्या आवाजाची काळजी घेणेबाबत कार्यशाळा आयोजित करणेबाबत.**

संदर्भ: अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांनी मा..मंत्री ,उच्च व तंत्रशिक्षण,विभाग,मंबई. यांना लिहीलेले पत्र क्र. मंत्री/उ व तं.शि/व्ही.आय.पी /१०७/२०२१, दिनांक-९/२/२०२१.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे.कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त पत्रान्वये उच्च शिक्षणातील सर्व शिक्षकांना आवाजाचा व्यावसायिक वापर ,त्याची काळजी कशी घ्यावी याबाबत ऑनलाईन कार्यशाळा घेण्याकरीता सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच त्यांची कार्यशाळा शिक्षकांसाठी अत्यंत उपयोगाची व उच्च व तंत्रशिक्षण विभागातील गुणवत्ता वाढीसाठी व शिक्षकांच्या आरोग्यासाठी अतिशय सकारात्मक परिणाम करणारी आहे, असेही नमूद केलेले आहे तरी सदर कार्यशाळा आयोजित करणेबाबत आपल्या अधिनस्त तसेच शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये यांना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात व त्याबाबत अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने.)
शिक्षण संचालक,उच्च शिक्षण.
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रत-

१. स्वीय सहायक, मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तारभवन,मुंबई.४०० ०३२.

२. मा.प्रधान सचिव, ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तारभवन,मुंबई-४०० ०३२.

३. अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र.

MITSC

Voice Clinic
Thane

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि ऑडिओलॉजस्ट व स्पिच लॅग्वेज पॅथॉलॉजिस्ट सोनाली लोहार, वॉईस क्लिनिक, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने यांच्या संयुक्त विद्यमाने



मा. उदयजी सामंत
कॅबिनेट मंत्री
महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# आवाज गुरुजनांचा- वेध देशाच्या भवितव्याचा

PHOTO

सोनाली लोहार 'VOICE CARE WORKSHOP' For Teacher

MITSC

Voice Clinic, Thane

# प्रस्तावना

भारत आता तरुणांचा देश म्हटला जातो. या तरुणांच्या देशांमध्ये 70 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या जेव्हा युवा आहे, तेव्हा निश्चितच एक आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न प्रत्येक भारतीयाला खुणावत आहे. या युवकांच्या हाताला काम आणि डोक्याला विचार देण्यासाठी सर्वात मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी आहे ती आपल्या शिक्षकांच्या वर. "गुरु विना कोण दाखवील वाट' हे संतांचे पाठांतर करत करत मोठी होणारी पिढी करिअरच्या वाटेवर प्रत्येक वेळी मार्गदर्शनासाठी ज्यांच्याकडे भक्तीने पाहते ते म्हणजे आपण सर्व शिक्षक! समाजामध्ये कलाकार, राजकीय नेतृत्व करणारी मंडळी, व्यावसायिक नेतृत्व करणारी मंडळी हे सर्व 'प्रोफेशनल व्हाईस यूजर' म्हणून गणले जातात. पण माझ्यासाठी या सर्वांच्या पेक्षा जास्त महत्त्वाचा आहे तो आपला शिक्षक आणि या शिक्षकाचा आवाज !

आवाजाची काळजी घेण्यासाठी आणि आवाजाची पोत सुधारण्यासाठी, त्याचबरोबर व्यावसायिकदृष्ट्या अधिकाधिक अचूकपणे आवाजाचा वापर करण्यासाठीची क्षमता प्रत्येक शिक्षकांच्यामध्ये असणे गरजेचे आहे आणि त्यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे आवाजच शास्त्र समजून घेणे, आवाज निर्माण कसा होतो हे जाणून घेणे, त्याचप्रमाणे शरीरामध्ये दीर्घकालीन परिणाम करणारे काही आजार होत असताना आवाजाच्या माध्यमातून त्यांची चाहूल सगळ्यात आधी कशा रितीने लागू शकते हे जाणून घेणे. संवादाच्या या सगळ्यात महत्वाच्या माध्यमाची काळजी कशी घ्यावी, हे सर्व प्रत्येक शिक्षकाला माहीत असले पाहिजे असे मला वाटते. त्यामुळेच आम्ही घेऊन आलो आहोत आपल्यासाठी, आपल्या सर्व युवा पिढी घडवणाऱ्या शिक्षकांसाठी, प्राध्यापकांसाठी आणि या सर्व शिक्षण व्यवस्थेचे नेतृत्व करणाऱ्या पदाधिकाऱ्यांसाठी एक 'आवाजाची कार्यशाळा'।

Voice Clinic, Thane

# माहितीपत्रक

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व ऑडिओलॉजिस्ट व स्पिच लॅग्वेज पॅथॉलॉजिस्ट सोनाली लोहार, वॉईस क्लिनिक, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च माध्यमिक शिक्षक व प्राध्यापक यांच्या आवाजाची काळजी घेतली जावी व आवाज प्रभावी बनावा' यासाठी 'Voice Care' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षकांच्या आवाजाचे स्वास्थ्य ही एक अत्यंत महत्वाची पण दुर्लक्षित बाब आहे. जागतिक स्तरावर याबाबत आता जागरूकता येत आहे. त्याचप्रमाणे प्राध्यापकांचे व्यक्तिमत्वही विद्यार्थ्यांना अनुकरणीय असले पाहिजे आणि आवाज हे व्यक्तिमत्वाचे महत्त्वाचे अंग आहे. आपण सर्वजण कोल्हापूर, महाराष्ट्रातल्या किंबहुना भारताच्या भवितव्यासाठी महत्त्वाचे शिल्पकार आहात. यामुळे माझे आपणा सर्वांना आवाहन आहे की, अत्यल्प सेवाशुल्क आकारून घेत असलेल्या या कार्यशाळेमध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे व आपल्या आवाजाचे भविष्य सुरक्षित करावे. आपल्या कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा!

# कार्यपदधती

**उच्च व तंत्रशिक्षण विभागाची जबाबदारी** – सदर उपक्रम प्रत्येक शिक्षकांच्यापर्यंत पोहोचावा, यासाठी विद्यापीठ प्रशासनाबरोबरच सहायक शिक्षण संचालकांच्या मदतीने महाविद्यालयापर्यंत उपक्रमाची माहिती पोहचवणे. सदर उपक्रम अपेक्षित परिणाम देत आहे की नाही, यासाठी वेळोवेळी अहवाल मागवुन घेणे व गुणवता वाढीसाठी मार्गदर्शन करणे.

**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राची जबाबदारी**- आवश्यक असणारी सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे, आवश्यक असणारे सर्व व्याख्याते, मार्गदर्शक उपलब्ध करून देणे. शिक्षकांच्यापर्यंत माहिती पोहचण्यासाठी नियमित उपक्रमाची दिनदर्शिका उपलब्ध करून देणे, उपक्रम नियमितपणे व सुरळीत सुरू राहण्यासाठी आवश्यक साधनसामग्री उभी करणे.

**विद्यापीठस्तरीय जबाबदारी** –संलग्न महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्यापर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी विद्यापीठ प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

**महाविद्यालयांची जबाबदारी**- महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्यापर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

# व्यवस्थापकीय रचना



# नाव नोंदणीसाठी आवश्यक

- कालावधी - ३ तास
- नोंदणी शुल्क - १५३५/-
- ऑनलाईन नोंदणी फॉर्म
- शैक्षणिक संस्थेचे ओळखपत्र
- फोटो
- संस्था प्रमुखाचे शिफारस पत्र
- प्रथम नोंदणी प्रथम प्राधान्य

# नोंदणी प्रक्रिया

Google Form

https://forms.gle/gxUQbJjLzLW4k9K29

↓

Payment Link

https://gpay.app.goo.gl/pay-rGPYCYuWeDZ

↓

Date Confirmation

↓

Workshop Participation

↓

Certification